18-04-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 04/17/2025 10:10 PM Page 1



फोंड्यातील मुख्य नाल्यावर स्टील जाळी बसणार!

पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com





सुपर ओव्हरमध्ये दिल्लीचा 'सुपर' विजय

पान ४ वर

वेर्णा, शुक्रवार, १८ एप्रिल २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 225 | Verna, | facebook.com/dainikherald | Friday 18 April 2025 | Pages 4 | ₹ 4

# मंत्री गावडेंचे 'तांत्रिक' स्पष्टीकरण

## कला अकादमीत लाईट फ्लिकरिंग प्रकार दुर्दैवी मानवी चूक नाही : गावडे

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. १७ : कला आणि संस्कृती मंत्री गोविंद गावडे यांनी अलीकडेच दीनानाथ मंगेशकर कला मंदिरात झालेल्या लाईट फ्लिकरिंगच्या प्रकाराला दुर्दैवी असे संबोधले असून, या प्रकारामागे मानवी चूक नसून तांत्रिक बिघाड कारणीभूत असल्याचे स्पष्ट केले आहे.**

गुरुवारी कला अकादमी येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत मंत्री गावडे यांनी सांगितले की, लाईट फ्लिकरिंगची ही घटना संपूर्णपणे सिस्टममधील तांत्रिक अडचणीमुळे झाली असून, तांत्रिक टीमने कन्सोलच्या माध्यमातून ती दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला. या प्रक्रियेत कोणत्याही कर्मचाऱ्यांनी निष्काळजीपणा दाखवलेला नाही, हे त्यांनी ठामपणे सांगितले.

गावडे यांनी कला अकादमीच्या सदस्य सचिवांना या घटनेचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले असून, भविष्यात अशा समस्या उद्भवू नयेत यासाठी विद्यमान प्रकाशयंत्रणेतील पायाभूत सुविधांत सुधारणा करण्यात येणार असल्याची माहिती दिली.

मंत्री गावडे यांनी स्पष्ट केले की, दीनानाथ मंगेशकर कला मंदिरातील सध्याची प्रकाशव्यवस्था कॅनरा कंपनीच्या एलईडी दिव्यांवर आधारित असून, ही दिवे साखळीप्रमाणे एकमेकांशी जोडलेले आहेत. या लूपिंग सर्किटपद्धतीमुळे एका दिव्यात बिघाड झाला, तर संपूर्ण सर्किटवर परिणाम होतो. सद्यस्थितीत ही प्रकाशव्यवस्था पीडब्ल्यूडीच्या करारात समाविष्ट असलेल्या दोषदायित्व कालावधीतच येते.

घटनेचा तपशील देताना त्यांनी सांगितले की, मराठी नाटक 'पुरुष' सुरळीत सुरू झाले होते. मात्र, सायंकाळी सुमारे ४.४० वाजता एक स्टेज लाईट अचानक चमकू लागला आणि त्यानंतर इतर स्टेज लाईट्समध्येही तीच समस्या निर्माण झाली. नाटकाच्या लाईट ऑपरेटरने कन्सोलद्वारे ती तांत्रिक अडचण सोडवण्याचा प्रयत्न केला, मात्र तो यशस्वी झाला नाही. प्रकाश तंत्रज्ञांना सिस्टममध्येच दोष असल्याचे लक्षात आल्यावर नाटक थांबवावे लागले. त्यानंतर सुमारे दहा मिनिटांनंतर हॅलोजन लाईटच्या सहाय्याने प्रयोग पुन्हा सुरू करण्यात आला.

नाटक सुरू असल्याने आणि स्टेजवर संपूर्ण सेटअप असल्यामुळे लाईट बॅटन खाली आणण्यात अडथळा येत होता. प्रत्येक दिव्याची तपासणी करणे शक्य नव्हते, त्यामुळे विलंब झाला, असेही मंत्री गावडे यांनी स्पष्ट केले.

या तांत्रिक बिघाडानंतर नाट्यप्रयोगात निर्माण झालेल्या अडचणीवर प्रतिक्रिया देताना ज्येष्ठ अभिनेते शरद पोंक्षे यांनी मंत्री गावडे यांच्यावर टीका केली होती. यावर उत्तर देताना गावडे म्हणाले की , पोंक्षे यांनी माझे नाव वापरून माध्यमांमध्ये चुकीचे विधान दिले. त्यांचा उद्देश माझी प्रतिमा मलीन करण्याचा होता. काही लोकांनी जाणीवपूर्वक माझ्या विरोधात मोहीम राबवली आहे.

त्यांनी असेही म्हटले की, निर्मितीसंघाने कला अकादमीची साउंड सिस्टीम वापरली नाही, हे विधानही चुकीचे आहे. जर तांत्रिक बिघाड झाला असेल, तर तो दुरुस्त करता येतो. मग यात मला का ओढायचे? तसेच, कला आणि संस्कृती विभागाला कला अकादमीची स्ट्रक्चरल स्थिरतेविषयीचा अहवाल प्राप्त झाला असून, आता केवळ इन्व्हेंटरी सादर करणे बाकी असल्याचेही गावडे यांनी स्पष्ट केले.



# ५० कोटींचा कुत्रा; ईडीकडून छापा

**नवी दिल्ली, दि. १७** : बंगळुरूमधील एका उद्योजकाने सुमारे ५० कोटी रुपये खर्चून 'लांडगा आणि कॉकेशियन शेफर्ड यांच्यातील क्रॉस' असा कुत्रा (वोल्फडॉग) खरेदी केल्याचा दावा केला असून, या प्रकरणात परकीय चलन व्यवस्थापन कायद्यानुसार (फेमा ) कोणतेही उल्लंघन झाले का, याची चौकशी सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर अंमलबजावणी संचालनालयाच्या पथकाने गुरुवारी संबंधित व्यक्तीच्या निवासस्थानी छापा टाकला.

ईडीच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, छाप्यामध्ये एस. सतीश यांच्या बंगल्याची झडती घेण्यात आली. त्यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये 'कॅडाबॉम्ब ओकामी' नावाचा कुत्रा खरेदी केल्याचा दावा केला होता. ही खरेदी किती प्रमाणात कायदेशीर मार्गाने करण्यात आली याचा तपास केला जात आहे.

ईडीच्या अधिकाऱ्यांनी सतीश यांचे बँक खाते तपासले असता, कुत्रा खरेदीच्या वेळी कोणताही मोठा आर्थिक व्यवहार झाल्याचे निदर्शनास आले नाही. त्यामुळे यामध्ये हवाला मार्गांचा वापर झाल्याची शंका तपास यंत्रणांनी व्यक्त केली आहे.

याशिवाय, संबंधित कुत्रा खरोखरच परदेशी वंशाचा आहे का, याबाबतही शंका उपस्थित करण्यात आली आहे. कुत्रा भारतीय जातीचा असण्याची शक्यता असून, प्राथमिक तपासात तसे संकेत मिळत आहेत. तरीही, चौकशी सुरूच आहे, अशी माहिती एका अधिकाऱ्याने दिली.

'न्यूयॉर्क पोस्ट' या आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, इंडियन डॉग ब्रीडर्स असोसिएशनचे अध्यक्ष असलेल्या सतीश यांनी या कुत्र्यासाठी तब्बल ५.७ दशलक्ष डॉलर्स (सुमारे ५० कोटी रुपये) खर्च केल्याचा दावा केला आहे.

## निवडक

### कुणाल कामराला अंतरिम दिलासा

मुंबई, दि. १७ : 'गद्दार' गीताद्वारे महाराष्ट्रातील मिंधे गटाच्या कृत्यांची चिरफाड करणाऱ्या स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याला मुंबई उच्च न्यायालयाकडून गुरुवारी अंतरिम दिलासा मिळाला. जबाब नोंदवण्यासाठी कुणालला अटक करण्याची आवश्यकता नाही, त्याचा जबाब तामिळनाडूमध्ये जाऊन नोंदवू शकत नाही का, असा सवाल करत हायकोर्टाने कुणालवर सूड उगवण्यापासून सरकारला तूर्तास रोखले. निकाल जाहीर करेपर्यंत कुणालविरोधात कारवाई करू नका, असे बजावत न्यायमूर्ती सारंग कोतवाल यांच्या खंडपीठाने याचिकेवरील निकाल राखून ठेवला.

स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याने गायलेले विडंबनात्मक गद्दार' गीत मिंधे गटाला चांगलेच झोंबल्याने मिंध्यांकडून कुणालला धमक्या दिल्या जात आहेत. या प्रकरणी आकसापोटी मिंध्याच्या कार्यकर्त्यांनी कुणालविरोधात चार गुन्हे दाखल केले आहेत.

------------

### दुर्गेश पाठक यांच्या घरावर छापा

नवी दिल्ली, दि. १७ : आम आदमी पक्षाचे (आप) माजी आमदार दुर्गेश पाठक यांच्या घरावर सीबीआयने गुरुवारी छापा टाकला. सीबीआय अधिकाऱ्यांच्या मते, ही कारवाई परदेशी निधीशी संबंधित एका प्रकरणासंदर्भात करण्यात येत आहे. सीबीआयने बुधवारी 'आप'विरुद्ध परकीय योगदान नियमन कायद्याअंतर्गत (एफसीआरए) गुन्हा दाखल केला. सीबीआयच्या एफआयआरनुसार, १५५ परदेशी नागरिकांनी ५५ पासपोर्ट क्रमांक वापरून ४०४ वेळा पक्षाला एकूण १.०२ कोटी रुपयांचे दान केले. अनेक देणगीदारांनी समान पासपोर्ट क्रमांक वापरला, ज्यामुळे फसवणुकीचा संशय निर्माण झाला. 'आप'ने उत्तर दिले की २०१ परदेशी नागरिकांनी पक्षाला देणगी दिली. ५१ ईमेल आयडीद्वारे ६३९ वेळा २.६५ कोटी रुपयांचे दान केले. सर्व देणग्या पारदर्शक पद्धतीने देण्यात आल्या आहेत आणि त्यांच्याकडे संपूर्ण नोंदी आहेत.

----------

### तिसऱ्या दिवशीही वधेरांची चौकशी

नवी दिल्ली, दि. १७ : काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांचे पती रॉबर्ट वधेरा यांची सलग तिसऱ्या दिवशी ईडीने चौकशी केली. गुरूवारी सलग तिसऱ्या दिवशी जेव्हा रॉबर्ट वधेरा ईडी कार्यालयात पोहोचले तेव्हा प्रियंका गांधीही त्यांच्यासोबत उपस्थित होत्या. ईडी चौकशीनंतर रॉबर्ट वधेरा म्हणाले की, चौकशीत कोणताही नवीन प्रश्न नव्हता. जर उद्या सार्वजनिक सुट्टी नसती तर मला माझा वाढदिवस ईडी कार्यालयात साजरा करावा लागला असता, असेही ते म्हणाले. ३ दिवसात जवळपास १३ तास रॉबर्ट वधेरा यांची चौकशी करण्यात आली. हरियाणातील शिकोहापूर जमीन व्यवहार प्रकरणी गुरूवारी सलग तिसऱ्या दिवशी ईडीने रॉबर्ट वधेरा यांची चौकशी केली. ईडी कार्यालयात प्रवेश करण्यापूर्वी वधेरा म्हणाले की, मी सर्व प्रश्नांची उत्तरे देणार आहे. मला २०१९ मध्येही हेच प्रश्न विचारले गेले होते. चौकशीत नवीन काही नाही. केंद्र सरकारच्या प्रचाराची आणि तपास यंत्रणांचा गैरवापर करण्याची ही शैली आहे. मात्र आम्ही घाबरणार नाही, असेही वधेरा म्हणाले.

**हवामान**

कमाल : ३२ किमान : २१
आर्द्रता : ६९

**बाजार भाव**

सोने : ₹ ९५,७८० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ९९,१०० (१ किलो)


**शेअर मार्केट**

सेन्सेक्स : ७७,३६५ .७७↑ (२३१.१६ )
निफ्टी : २३,२३५.९० ↑ (८३.९५)

# पाडी येथे बसच्या धडकेत दोघे तरूण ठार

**कामाला जाताना काळाचा घाला : बसवरील नियंत्रण सुटल्याने अपघात**

■ टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव, दि. १७** : राज्यात अपघातांचे सत्र सुरूच असून अपघाती मृत्यूंचे प्रमाणही वाढत आहे. दुचाकीवरून कामाला जात असताना पाडी – बार्शे याठिकाणी बुधवारी रात्री आंतरराज्य वोल्वो बसने धडक दिल्याने दुचाकीवरील दोघा तरुणांना मृत्यू झाला. दिलीप वेळीप (३८) व संदेश गावकर (२७) अशी मृतांची नावे आहेत. हे दोघेही गोकुल्डे– बार्से येथील आहेत. याप्रकरणी कुंकळ्ळी पोलिसांनी राजेश शिवोल्ली (५५) या बसचालकाला ताब्यात घेऊन अटक केली. तसेच बसही जप्त केली आहे. अपघात रात्री ८.३० च्या सुमारास घडला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिलीप वेळीप व संदेश गावकर हे दोघे रात्री कामावर जात होते. संदेश हा दुचाकी चालवित होता तर दिलीप हा मागे बसला होता. बस मडगावहून बंगळुरूला जात होती. पाडी येथील वळणावर बसचालकाचे बसवरील नियंत्रण सुटले आणि बसची धडक दुचाकीला बसली. यात दिलीप व संदेश हे दोघेही गंभीर जखमी झाले. अपघातानंतर खासगी बसचालकाने घटनास्थळावरुन पळ काढला. जखमींना बाळ्ळी येथील आरोग्य केंद्रात नेण्यात आले मात्र, त्यांचा मृत्यू झाला. कुंकळ्ळी पोलिसांनी या घटनेचा पंचनामा केला. कुंकळ्ळी पोलिसांनी घटनास्थळावरून पसार झालेल्या बसचालकासह बस यल्लापूर येथून ताब्यात घेतली. त्यानंतर बसचालकावर गुन्हा नोंद करून त्याला रितसर अटक केली. पोलिस निरीक्षक डायगो ग्रासियस यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक आदित्य सावंत पुढील तपास करीत आहेत.

# कचरा फेकणाऱ्या २१११ जणांवर गुन्हे

**कुंकळ्ळीत सर्वाधिक प्रकरणे तर मुरगावात कमी प्रकरणांची नोंद**

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १७** : दक्षिण गोव्यातील विविध पोलिस ठाण्यांनी १३ एप्रिल २०२५ पर्यंत गोवा नॉन–बायोडिग्रेडेबल कचरा (नियंत्रण) कायदा, १९९६ अंतर्गत एकूण २१११ गुन्हे नोंदवले आहेत. या गुन्ह्यांमध्ये सर्वाधिक प्रकरणे काणकोण पोलिसांकडून (४७९) नोंदवण्यात आली आहेत.

इतर ठाण्यांतील आकडेवारीनुसार, कुंकळ्ळी पोलिसांनी २४८, फातोर्डा पोलिसांनी १८५, फोंडा पोलिसांनी १७३, केपे १९१, मायना कुडतरी १५२, कुडचडे २८६, सांगे १०२, कोलवा ६२, वास्को ८०, म्हार्दोळ ७६,




काले ४२ आणि वेर्णा पोलिसांनी २३ प्रकरणांची नोंद केली आहे. याशिवाय, मुरगावमध्ये केवळ २ प्रकरणे, तर दाबोळी विमानतळ आणि वास्को रेल्वे स्थानक ठाण्यांमध्ये कोणतीही नोंद नाही, हे विशेष उल्लेखनीय आहे.

मडगाव शहर, जे दक्षिण गोव्यातील प्रमुख व्यावसायिक केंद्र मानले जाते, तेथे उघड्यावर कचरा टाकण्याचे प्रमाण चिंताजनक स्वरूप धारण करत आहे. सार्वजनिक ठिकाणी आणि गटारांमध्ये प्लास्टिकसारखा नॉन–बायोडिग्रेडेबल कचरा टाकणे हा कायद्याने दंडनीय गुन्हा आहे. तरीदेखील, शहरातील अनेक ठिकाणी उघड्यावर टाकलेला कचरा प्राणी खाताना दिसतात , आणि त्यातून अनेक आरोग्यविषयक समस्यांचा उद्भव होत आहे.

१८ डिसेंबर २०२४ पर्यंत दक्षिण गोवा पोलिसांनी या कायद्याअंतर्गत एकूण ७,३४२ प्रकरणे नोंदवली होती. याआधीच्या वर्षी म्हणजे २०२३ मध्ये ही संख्या ६,७४६ होती. यामध्ये कुडचडे पोलिस ठाण्याने सर्वाधिक १,८७० प्रकरणे नोंदवून आघाडी घेतली होती.

स्थानिक प्रशासनाने घरगुती कचरा संकलनाची जबाबदारी स्वीकारलेली असली, तरीही अनेक नागरिक अंधाराचा फायदा घेत पहाटे किंवा रात्रीच्या वेळी बेकायदेशीरपणे कचरा टाकत असल्याचे निदर्शनास

पान २ ▶



# राज्यातील पोलिस निरीक्षकांच्या बदल्या

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १७** : दोन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पोलिस निरीक्षकांच्या बदल्यांचे आदेश जारी झाले आहेत. पोलिस निरीक्षक दत्तगुरू सावंत यांची सुरक्षा विभागातून (पणजी) पणजी किनारपट्टी सुरक्षा विभागात बदली झाली आहे. आदेशानुसार, गिरेंद्र नाईक हे मांद्रेचे, निनाद देऊलकर हे मोपा विमानतळ पोलिस स्थानकाचे तर चेतन सौळेकर हे हणजुण पोलिस स्थानकाचे नवे पोलिस निरीक्षक असतील.

हिरू कवळेकर यांची रायबंदर गुन्हे शाखेत, गौरेश परब यांची पोलिस मुख्यालयात, सोमनाथ माजिक यांची तेरेखोल किनारी सुरक्षा पोलीस स्थानकात तर, शरीफ जॅकीस यांची मुरगाव पोलिस स्थानकाच्या निरीक्षकपदी बदली झाली आहे. महेश केरकर यांची मोपा वाहतूक विभागातून पोलिस कल्याण विभाग आल्तिनो येथे तर टेरेन्ज वाझ यांची गुप्तचर विभागातून राखीव दलात बदली करण्यात आली आहे. विक्रम नाईक यांची तेरेखोल येथून पणजी सुरक्षा विभागात, चंद्रकांत गावस यांची पणजी सुरक्षा विभागातून डिचोली वाहतूक विभागात बदली झाली आहे. महेश वेळीप यांची पणजी मुख्यालयातून कुडचडे वाहतूक

पान २ ▶

# मिशनरीज ऑफ चॅरिटीची राजधानीतील सेवा थांबणार

## ४९ वर्षांचा अध्याय संपणार संस्थेच्या सेवांची आवश्यकता कमी भासत नसल्याने घेतला निर्णय

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १७** : संत मदर तेरेसा यांनी स्थापन केलेली मिशनरीज ऑफ चॅरिटी संस्था २८ एप्रिल रोजी सांत इनेज, पणजी येथील आपले सेवा केंद्र बंद करणार आहे. या निर्णयामुळे गेल्या ४९ वर्षांपासून गरीब, निराधार व उपेक्षितांसाठी सुरू असलेली सेवा थांबणार आहे. ही संस्था जानेवारी १९७६ मध्ये मदर तेरेसा यांच्या गोवा भेटीनंतर सुरू करण्यात आली होती. तेव्हापासून या संस्थेच्या माध्यमातून निराधार महिला, अविवाहित माता, अनाथ मुले आणि वृद्ध नागरिकांची काळजी घेतली जात होती.

संस्थेच्या वरिष्ठ सिस्टर्सपैकी एक असलेल्या सिस्टर रोसारिया यांनी हेराल्ड मीडियाशी बोलताना सांगितले की , आम्हाला आमच्या कोलकाता मुख्यालयाकडून दुसऱ्या ठिकाणी जाण्याचा आदेश मिळाला आहे. मदर तेरेसा यांनी ही संस्था सुरू केली होती. आम्ही हे केंद्र असिस्टेन्सिया डी गोवाला सुपूर्द करू आणि गरिबांच्या सेवेसाठी जिथे आवश्यक असेल तिथे जाऊ.

संस्थेच्या मते, पणजीतील परिस्थिती आता बऱ्याच प्रमाणात सुधारली आहे आणि संस्थेच्या सेवांची आवश्यकता आता कमी भासते. पणजी आता समृद्ध आहे, त्यामुळे आम्ही जिथे गरीब लोक आहेत, तिथे जाऊ इच्छितो असेही सिस्टर रोसारिया यांनी स्पष्ट केले.

सध्या या केंद्रात वास्तव्य करत असलेल्या ४४ रहिवाशांपैकी २६ जणांना आधीच करमळी आणि कोटा–फातर्पा येथील केंद्रांमध्ये हलवण्यात आले आहे. उर्वरित १८ जणांचे स्थलांतर २४ एप्रिल रोजी, म्हणजे केंद्र बंद होण्याच्या चार दिवस आधी केले जाणार आहे.

गेल्या काही वर्षांपासून दत्तक प्रक्रिया बंद केली असली तरी, या संस्थेने जवळपास ५०० मुलांना दत्तक देण्याची संधी दिली आहे. या मुलांपैकी अनेक आज स्वतःच्या संसारात स्थिरस्थावर झाले असून काहीजण आपल्या कुटुंबासह संस्थेला भेट देत असतात. आम्ही त्यांच्या जीवनात आनंद आणला, हीच आमच्यासाठी सर्वात मोठी संपत्ती आहे, असे सिस्टर रोसारिया यांनी सांगितले.

मिशनरीज ऑफ चॅरिटीच्या सुपीरियर जनरल सिस्टर एम. जोसेफ यांनी असिस्टेन्सिया डी गोवाला पत्र लिहून संपूर्ण परिसर संस्थेकडे परत करण्याचा निर्णय कळवला आहे. १९७६ पासून गरीबांमध्ये गरिबांची सेवा करण्याची संधी मिळाल्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

असिस्टेन्सिया डी गोवाच्या विश्वस्तांनी सांगितले की, मिशनरीज ऑफ चॅरिटीच्या सिस्टर्सनी आर्चबिशपशी भेट घेऊन सांगितले की त्यांना हे काम आता थांबवायचे आहे कारण पणजीला अशा प्रकारच्या संस्थेची आवश्यकता नाही. त्यांच्या निर्णयाने आम्हालाही आश्चर्य वाटले आहे.

# काश्मीर, बलुचिस्तानवर पाकच्या लष्करप्रमुखांचे वादग्रस्त भाष्य; भारतातही प्रतिक्रिया

**इस्लामाबाद, दि. १७ :**

पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांनी बुधवारी इस्लामाबाद येथे झालेल्या 'ओव्हरसीज पाकिस्तानी कन्व्हेन्शन २०२५' या कार्यक्रमात काश्मीर, हिंदू समाज, बलुचिस्तान आणि भारतीय लष्कराबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे भारत आणि पाकिस्तानमध्ये चर्चांना उधाण आले आहे.

या कार्यक्रमात पंतप्रधान शहबाज शरीफ यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. प्रवासी पाकिस्तानींना उद्देशून दिलेल्या भाषणात जनरल मुनीर यांनी द्विराष्ट्र सिद्धांत, देशाच्या सुरक्षेची भूमिका, आणि पाकिस्तानच्या एकात्मतेविषयी अनेक ठाम भूमिका मांडल्या.

मुनीर म्हणाले की, आपल्या पूर्वजांना वाटायचे की आपण हिंदूंपेक्षा सर्वच बाबतीत वेगळे आहोत. धर्म, संस्कृती, विचार आणि महत्त्वाकांक्षा यांतही. याच भावनेतून द्विराष्ट्र सिद्धांताचा जन्म झाला आणि पाकिस्तानची स्थापना झाली.

त्यांनी पुढे सांगितले की,१९७१ मध्ये बांगलादेश वेगळा झाला असला, तरीही आम्ही अजूनही या विचाराशी बांधील आहोत. पाकिस्तान हे स्वतंत्र राष्ट्र आहे आणि आमच्या पूर्वजांनी या देशासाठी मोठे बलिदान दिले आहे.

दहशतवादाचा उल्लेख करताना त्यांनी पाकिस्तानविरोधात आंतरराष्ट्रीय पातळीवर उभ्या राहणाऱ्या कथानकांवर नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की , जर आमची सशस्त्र सेना १३ लाख भारतीय सैन्याचा सामना करू शकते, तर काही दहशतवादी आमच्या भविष्यावर गदा आणू शकत नाहीत.

बलुचिस्तानमधील वाढत्या असंतोषावर भाष्य करताना त्यांनी म्हटले, बलुचिस्तान हे पाकिस्तानच्या कपाळावरील तुरा आहे. काही शेकडो फुटीरतावादी गट ते हिरावून घेऊ शकत नाहीत. आम्ही या दहशतवादी कारवायांचा लवकरच पूर्ण नायनाट करू. काश्मीरबाबत बोलताना मुनीर म्हणाले, काश्मीरच्या मुद्द्यावर आमच्या सरकार आणि लष्कराची भूमिका ठाम आहे. आम्ही आमच्या काश्मीरी बांधवांना विसरणार नाही.

जनरल मुनीर यांच्या बलुचिस्तानविषयी वक्तव्यानंतर बलुच अमेरिकन काँग्रेसने तीव्र प्रतिक्रिया दिली. त्यांनी एक्स (पूर्वीचे ट्विटर) वर म्हटले आहे की, बांगलादेशमधील अपमानाची पुनरावृत्ती होण्याआधी पाकिस्तान सैन्याने बलुचिस्तानमधून सन्मानाने माघार घ्यावी.मुनीर यांच्या भाषणावर सोशल मीडियावर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. काहींनी त्यांच्या विधानांचे समर्थन केले, तर काहींनी टीका केली. एका वापरकर्त्याने लिहिले, महिलांवर अत्याचार, अपहरण, आणि अन्याय होत असताना, हे विधान स्वीकारण्यासारखे नाही. भारतामध्येही या वक्तव्यावर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. शिवसेना (यूबीटी) खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी लिहिले, हो, पाकिस्तान आणि भारत हे वेगवेगळे राष्ट्र आहेत आणि आमच्या महत्त्वाकांक्षाही वेगळ्या आहेत. भारत जागतिक नेतृत्वासाठी

पान २ ▶